---

## * प्र क र ण – 4 थे *

---

## 'समाधीवरील अश्रू' या संग्रहातील मृत्युलेखांचे स्वरुप आणि वैशिष्ट्ये.

'समाधीवरील अश्रू' या मृत्युलेखसंग्रहात आचार्य अत्रे लिखित 18 मृत्युलेखांचा समावेश आहे. या मृत्युलेखांचे स्वरुप प्रदीर्घ आहे. त्यामुळे 'हुंदके ' या संग्रहातील मृत्युलेख व 'समाधीवरील अश्रू' या संग्रहातील मृत्युलेख यात विस्ताराच्या दृष्टीने खूपच फरक आहे. 'हुंदके' मधील मृत्युलेखांचे स्वरुप अग्रलेखांचे आहे. कारण ते मृत्युलेख 'मराठा' च्या अग्रलेखांसाठी लिहिलेले आहेत. त्यामुळे ते विस्ताराच्या दृष्टीने लहान आहेत तर 'समाधीवरील अश्रू' संग्रहातील काही मृत्युलेख अत्र्यांनी आपल्या 'नवयुग' ह्या साप्ताहिकामधून लिहिलेले असल्याने स्वाभाविकपणे हे लेखन प्रदीर्घ झाले आहे. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वासह एकूण जीवनकार्याचे मूल्यमापन अत्रे करताना दिसतात. साहित्यिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातील व्यक्तींवरील हे प्रासंगिक लेखन असूनही वाङ्.मयीन गुणांच्या दृष्टीने श्रेष्ठ दर्जाचे आहे. अत्र्यांच्या अंतःकरणाला ज्या व्यक्तींचा मृत्यू भावला त्यांच्यावरील अत्र्यांनी केलेले मृत्युलेख लेखन अप्रतिम यशस्वी झाले आहे. वृत्तपत्र काय किंवा साप्ताहिक काय ! दोन्ही ठिकाणी संपादकाला प्रसंगाचे औचित्य राखावे लागत असते. हे औचित्य सांभाळत असताना अत्र्यांनी त्यात वाङ्.मयीन रंग भरले आहेत. वृत्तपत्रीय लेखनाबद्दल अत्रे म्हणतात "वृत्तपत्रातले लेखन हे बहुधा नैमित्तिक आणि तात्कालिक महत्त्वाचे असते. वाङ्.मयीन गुणांची सहसा त्यामध्ये कोणी अपेक्षा करीत नाही. ललित वाङ्.मय लिहिणाऱ्याला जेवढी सवड आणि जेवढे मनःस्वास्थ्य मिळते, तेवढे पत्रकाराला मिळू शकत नाही. काळ हा पत्रकाराचा मोठा शत्रू असतो. हत्तीच्या गंडस्थळावर असलेल्या माहुताप्रमाणे हातात अंकुश घेऊन तो पत्रकाराच्या बोकांडी असलेला असतो. झपाटयाने लिहावयाचे अन् पुन्हा ते चांगले लिहावयाचे ही तर तारेवरची कसरत आहे. अशा घिसाडघाईत साहित्यगुणांनी नटलेले आणि ज्यांचा समावेश उत्तम वाङ्.मयात होईल असे राजकीय आणि सामाजिक विषयांवरचे अनेक लेख मी 'नवयुगा' त कसे लिहू शकलो ह्याचे मला आता आश्चर्य वाटते".[1] अशा घिसडघाईतच अत्र्यांनी 'नवयुग' मधून लिहिलेले मृत्युलेख केवळ तत्कालिक न होता स्मरणीय झाले आहेत. हे लेखन जरी वृत्तपत्रीय स्वरुपाचे असले तरी त्याला अत्र्यांच्या वाङ्.मयीन शैलीच्या स्पर्शाचे सौंदर्य प्राप्त झाले आहे. याचे कारण अत्र्यांची वृत्ती साहित्यिकाची आहे. अत्रे आधी साहित्यिक आहेत

आणि नंतर पत्रकार आहेत. त्यामुळे त्यांची पत्रकारिता वाङ्.मयीन आहे. अत्र्यांनी लिहिलेले मृत्युलेख त्यांनी पत्रकाराच्या भूमिकेतून लिहिले असले तरीदेखील ते वाङ्.मयीन दृष्टीने श्रेष्ठ उतरले आहेत.

* **'समाधीवरील अश्रू' या मृत्युलेखसंग्रहातील मृत्युलेखांचे स्वरुप –**

* **ललित स्वरुपाचे दीर्घ निबंधात्मक मृत्युलेख –**

या संग्रहातील सर्वच मृत्युलेख ललितरम्य व दीर्घ निबंधात्मक असल्याने स्वाभाविकच त्यांचे लेखन प्रदीर्घ स्वरुपाचे आहे. अत्र्यांची वैचारिकता व चिंतनशीलता यांचे प्रत्यंतर या लेखनातून जागोजागी येते. तसेच मृत्युलेखांमधील भावसौंदर्य, आणि व्यक्तीविषयक अलोट प्रेम, जिव्हाळा याच बरोबरीने व्यक्तीजीवनाचे यथोचित मूल्यमापन यांचा सुंदर समन्वय या लेखनामध्ये अत्र्यांनी साधला आहे. व्यक्तिमत्त्व दर्शनाबरोबरच अत्र्यांची त्या व्यक्तीविषयीची चिंतनशीलता, भावना, अनुभव या अनुषंगाने या मृत्युलेखांमध्ये अत्र्यांच्या वैचारिक व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब पडलेले दिसून येते. अत्रे आधी गेलेली व्यक्ती स्वतः समजावून घेतात आणि यथोचित पद्धतीने ती वाचकांना समजावून देतात. त्या अनुषंगाने त्या व्यक्तीविषयीचे व एकंदरीतच सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक पार्श्वभूमीवरही ते विचार मांडतात. येथे केवळ भोळाभाबडा भक्तीभाव ते व्यक्त करीत नाहीत. व्यक्तीविषयक विचार मांडत असताना ते फक्त शब्दांची आतषबाजी करत नाहीत तरी यथोचितपणे व्यक्ती उभी करतात. तिचे वेगळेपण नेमके कशात होते याचे प्रतिपादन करतात.

* **व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वासह एकूणच जीवनकार्याचे मूल्यमापन करणारे लेखन –**

अत्रे मृत्युलेखामध्ये फक्त व्यक्तीच्या जीवनातील जंत्री देऊन लेखन करीत नाहीत. तर तिच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवत असताना अत्र्यांच्या चित्रमय शैलीचे प्रत्यंतर येते. ते व्यक्तीच्या चालण्याबोलण्याच्या समयीपासून ते पोशाखापर्यंत ते वर्णन करतात. त्या अनुषंगाने व्यक्तीच्या स्वभावाचे शरीरप्रकृतीचेही वर्णन येते. उदाहरणार्थ, साहित्यसम्राट न. चि. केळकर यांच्या शरीरप्रकृतीचे ढंगदार वर्णन करीत असताना अत्रे लिहितात, "तात्यांची प्रकृती अतिशय निकोप होती आणि त्यांचे आरोग्यही उत्तम होते. उभा जन्म त्यांनी श्रमात आणि कामात घालविला"[2] ह्या दोनच विधानांमधून अत्र्यांनी तात्यांच्या शरीरप्रकृतीचे ढंगदार वर्णन केल्याचे दिसते. थोडीशी अतिशयोक्ती पत्करुन पण रास्त असा व्यक्तीच्या कार्याचा गौरव करणे हा अत्र्यांचा स्वभाव असल्याने केळकरांच्या वाङ्.मयीन कर्तृत्वाविषयी लिहिताना अशा काहीशा अतिशयोक्तीने तरीही औचित्यपूर्ण पद्धतीने ते व्यक्तीचे मोठेपण वर्णन करतात.

ह्या मृत्युलेखांचा अभ्यास करीत असतांना अत्र्यांच्या व्यक्तिमत्त्वातील एकांगी आक्रमकतेचा

प्रत्यय येतो. ते व्यक्तीचे गुणगान करताना देहभान विसरून गुणगान करतात आणि व्यक्तीवर टीका करू लागले की, अक्षरशा झोडपून काढताना दिसतात. त्यांनी व्यक्तीच्या गुणवर्णनावर मृत्युलेख लिहिलेच पण व्यक्तीच्या दुर्गुणांवरही काही अपवादात्मक यशस्वी मृत्युलेखन केले आहे. " अत्रे गुणगातात ते स्वतःला त्यामध्ये फेकून देऊन गातात. हातचे काहीच राखत नाहीत. मतभेद नसेल तरी आणि असेल तरी ह्या गुणगायनासाठी आणि तसाच प्रसंग पडला तर निदांनालस्तीलाही उधान येते"[3] **समाधीवरील अश्रू'**मधील मृत्युलेखांच्या लेखनातही अत्र्यांच्या या शैलीचे प्रत्यंतर येते. गुणगानकरताना ते देशाविदेशांत सीमारेषा ओलांडून सातासमुद्रापलीकडे पोहचतात. भारताच्या दृष्टीने विन्स्टन चर्चिल आणि बॅ. जिना ह्या दोन्ही व्यक्ती शत्रूच पण चर्चिलचे व्यक्तिमत्त्व अत्र्यांना भावल्याने ते त्यांचा गौरव करतात. मात्र पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष बॅ. जिना यांच्यावर मृत्युलेख लिहित असताना त्यांच्याबद्दलचा आपल्या मनातील स्पष्ट उद्वेगही ते नोंदवतात. त्यामुळे या मृत्युलेखांमध्ये केवळ भावनिकता, व्यक्तिदर्शन, किंवा व्यक्तीविषयक चिंतनशीलता याही पुढे जाऊन अत्र्यांच्या व्यक्तिमत्वाचे स्पष्टवक्तेपणा आणि सचचेपणा जाणवतो. ज्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व अत्र्यांच्या मनाला खरोखरच भावते. त्या व्यक्तीबद्दल मृत्युलेख लिहिताना अत्र्यांच्या लेखणीला बहर येतो. त्या व्यक्तीविषयी ते हळहळतात. तिच मोठेपण सांगण्यासाठी ब-याच वेळी काही ठासून विधाने करतात. पुनररूक्तीचा दोष पत्करतात. पण त्यामुळे लेखनात कंटाळवाणेपणा येत नाही. हे लेखन होत असताना आपोआपच त्यांच्या त्या व्यक्तीविषयीचा हृदयंवाद रसिकाच्या प्रत्ययास येऊ लागतो. त्यात भावणीक ओलावा आलयाने कोठेही वर्तमानपत्री कोरडा ठणठणीतपणा जाणवत नाही. त्यांच्या निवेदना बरोबर ती व्यक्ती ते फुलवत नेतात. आणि रसिकही त्या बरोबर आपोआप झुलत राहतो. त्यांना व्यक्तीविषयी वाटणारा विलक्षण जिव्हाळा त्यांच्या शब्दांशब्दांमधून व्यक्त होत जातो. त्यानुळेच हे मृत्युलेख म्हणजे' करूणरम्य भावगीते' बनतात.

मृत्युलेखातील व्यक्तीच्या जडणघडणीची पार्श्वभूमी, ती व्यक्ती ज्या क्षेत्रातील असेल त्या क्षेत्रात तिने केलेल्या कार्याचे मूल्यमापन, त्या व्यक्तीचा स्वतःवर नेमका काय परिणाम झाला हे सारे ते लेखनाच्या ओघात सांगताना दिसतात. त्यामुळे निवर्तलेली व्यक्ती चित्रमयशैलीत वाचकासमोर अत्र्यांच्या लेखनातून उभी राहते. त्या व्यक्तिमत्वाला जिवंतपणा येतो.

हे लेख समाजातील अनेक स्तरांमधील व्यक्तीवर झाले असल्याने अत्र्यांच्या लोकसंग्रहाची पुरेपूर कल्पना येते. शिवाय ते मृत्युलेखात निव्वळ वरवरची माहिती देत नाहीत तर त्या अनुषंगाने त्या

त्या व्यक्तीच्या सामाजिकतेशी, सांस्कृतिकतेशी, राजकीयतेशी अथवा अन्य क्षेत्रांशी असणा-या संबंधानाही यथोचित महत्त्व देतात. माहितीच्या तपशीलांबरोबर काळाचे संदर्भही येतात. याबरोबरच ह्या लेखनास भावनिक ओलावाही प्राप्त झालेला आहे.एकंदरीत व्यक्तीच्या व्यक्तिमत्व दर्शनाबरोबर तिच्या जीवनकार्याचे यथोचित मूल्यमापन अत्र्यांनी मृत्युलेख लेखनात केले आहे.

**'समाधीवरील अश्रू' मधीलमृत्युलेखांचे व्यक्तीनिहाय वर्गीकरण**

1 ) राजकीय क्षेत्रातील व्यक्तीवरील मृत्युलेख ( 12 मृत्युलेख )

2 ) साहित्यिक क्षेत्रातील व्यक्तींवरीज मृत्युलेख ( 3 मृत्युलेख )

3 ) सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्तींवरील मृत्युलेख ( 3 मृत्युलेख )

1 )**राजकीय क्षेत्रातील व्यक्तीवरील मृत्युलेख**

राजकीय क्षेत्रातील व्यक्तीवरील मृत्युलेखात अत्र्यांनी व्यक्तीच्या व्यक्तीमत्व दर्शनबरोबरच तिच्या राजकीय कार्याचे मूल्यमापन केले आहे. अर्थात मृत्युलेखात ज्या व्यक्तीचें अत्रे गुणगाण गातात त्यांच्या व्यक्ती जिवंत असताना त्याच्यावर त्यांनी कडाडून टीकाही केली आहे. कॉंग्रेसच्या ब-याचशा नेत्यांशी अत्र्यांचे उभ्या जन्मात पटले नाही. त्यामुळे त्यांनी त्यांच्यावर परखडपणे टीका केली. त्याच व्यक्तींचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्यावर मृत्युलेख लिहित असताना अत्र्यांची लेखणी मतभेदाबाबत कमालीची संयमी बनते.याचे कारण, अत्रे व्यक्तीचे अंध भक्त नाहीत. त्यांच्याजवळ डोळसपणा आहे. या विषयी अत्रे म्हणतात, " जिवंतपणी ज्यांच्यावर मी प्रखर टीका केली त्याच्या मृत्युनंतर मी त्यांच्या गुणांची स्तोत्रे कशी गाऊ शकतो ह्याचे कितेकाना कोडे आहे. पण 'हृदय' असल्याखेरीज हे कोडे उलगडणार नाही. मी राजकारणी म्हणजे हृदयशून्य असतो. तर जिवंतपणी मी ज्यांच्यावर टीका केली त्यांच्या मरनानंतर मी त्यांना सडकून शिव्या दिल्या आसत्या. ते जास्त सुसंगत दिसले असते. पण मी भावनाप्रधान साहित्यिक असल्याने माझे रागद्वेष आणि मतभेद मरणानंतर संपतात." 4 ह्या भुमिकेतून अत्र्यांनी मृत्युलेखलेखन केल्यामुळे ते मतभेदांकडे दुर्लक्ष करून व्यक्तीच्या गुणांचा आणि कर्तृत्वाचा गौरव करताना दिसतात.

**' समाधीवरील अश्रू :** या संग्रहात समाविष्ट करण्यात आलेल्या राजकीय क्षेत्रातील व्यक्तीवरील मृत्युनेखात मं. गांधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरदार वल्लभभाई पटेल, पंडित नेहरू, श्यामाप्रसाद मुकर्जी, लालबहादुर शास्त्रा, स्वातंत्र्यवीर सावरकर,होमी मोदी, पं. दीनदयाळजी उपाध्याय, मरहुम महमदअल्ली जिना, इंग्लडचे राजे सहावे जॉर्ज विस्टन चर्चिल ह्या व्यक्तीवरील मृत्युलेख आहेत. ह्या संग्रहात एकूण अठरा मृत्युलेखांपैकी बारा मृत्युलेख राजकीय क्षेत्रातील व्यक्तीवर आहेत. म्हणजेच ह्या संग्रहात राजकीय क्षेत्रातील व्यक्तीवरील मृत्युलेख अधिक आहेत. राष्ट्रपिता म. गांधीच्या निर्घृण हत्येनंतर गांधीजींवर लिहिलेला 'महात्मा गांधी अमर हो गये।'

हा मृत्युलेख म्हणजे अत्र्यांनी ज्या काही राजकीय क्षेत्रातील महत्त्वाच्या व्यक्तींवर मृत्युलेख लिहिले त्यापैकी एक महत्त्वाचा मृत्युलेख होय. "अनेक ओजस्वी आणि उर्जस्वल प्रसंगानी युक्त अशी गांधीजींची जीवनगाथा कथन करीत. म. गांधींच्या व्यक्तिमत्त्वाचा मनोवेधी साक्षात्कार अत्रे येथे घडवितात."[5] गांधीजींच्या जीवनामध्ये ज्या काही घटना घडल्या आणि त्यामुळे त्यांच्या वैयक्तिक जीवनाला कलाटणी मिळून त्यांच्या मौलिक विचारांचा व कार्याचा देशाच्या राजकारणात कसा उपयोग झाला व गांधीजींच्या रुपाने केवळ हिंदुस्थानच नाहीतर संपूर्ण जगाला मानवतेचा साक्षात्कार कसा झाला याचे अत्यंत प्रभावी चित्रण या लेखात ते करतात. गांधीजींचे वैयक्तिक जीवन हेदेखील एका अर्थाने रणांगणच होते. त्यांच्या जीवनात अनेक परस्परविरोधी घटना घडल्या आणि त्या घटनांमधूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व घडत गेले. प्रत्येक युगामध्ये मानवतेच्या काही गुणांचा विकास होत असतो. तो गांधींच्या व्यक्तिमत्त्वात होता आणि जो मानवतेचा –हास होतो तो त्यांच्या मारेक–यांच्या व्यक्तिमत्त्वात होता असे अत्र्यांना वाटते. त्यांच्या राजकारणाला असणारा आध्यात्मिक स्पर्श, अहिंसा, सेवाभाव, संयमी स्वभाव याचे चित्रण त्यांच्या जीवनातील अनेक घटना व प्रसंगांच्या माध्यमातून केले आहे. लेखाची भाषाशैली अत्यंत वेधक असून गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वातील प्रसन्नता, आस्थेवाईकता, व आत्मीयता यांचे या लेखात दर्शन घडते. अत्र्यांच्या मनात गांधीच्या हत्येबद्दल भावविवशता तर आहेच. पण त्याचबरोबरीने लेखनात लालित्यही आहे. हा मृत्युलेख केवळ गांधींच्या मृत्युपुरता मर्यादित न राहता गांधीचे व्यक्तिमत्त्व वाचकांच्या मनावर दीर्घकाळ बिंबवण्याच्या दृष्टीने यशस्वी झाला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील 'भारताचा उद्धारकर्ता महात्मा !' हा मृत्युलेख म्हणजे भारतीय राजकारण आणि समाजकारण यात बाबासाहेबांचे योगदान किती महत्त्वपूर्ण होते यासंबंधी अत्र्यांनी अत्यंत स्पष्टवक्तेपणाने केलेले भाष्य होय. बाबासाहेब हे भारतीय राजकारण आणि समाजकारणातील एक वादळी व्यक्तिमत्त्व होते. या वादळाने स्वतःचा विचार कधीच केला नाही. आपले सारे आयुष्य आपल्या बांधवांच्या उद्धारासाठी त्यांनी कारणीलावले 'पण' अखेरपर्यंत या देशाने त्यांना ओळखलेच नाही. त्यांना आपली सारी हयात आपल्या बांधवांच्या हक्कासाठी स्वकीयांशी लढण्यातच घालवावी लागली. "भारत हा मोठा दुर्दैवी देश आहे. अगोदर येथे महापुरुष शतकाशतकातून एकदाच जन्माला येतो आणि तो जन्माला आला तरी ह्या देशातले कोटयावधी मूर्ख लोक त्याचे मोठेपण त्यांच्या हयातीत मुळी ओळखतच नाहीत"[6] बाबासाहेबांचे हे असेच झाले. ते खरे देशभक्त असूनही राजकारण्यांनी मात्र त्यांना देशद्रोही ठरवले. अस्पृश्यता निवारणासाठी त्यांना काँग्रेसशी आणि खुद्द गांधींशीही झगडावे लागले. हे अत्रे सडेतोडपणे सांगतात. अस्पृश्यता कायद्याने गेली पाहिजे आणि अस्पृश्यांना कायद्याचे संरक्षण मिळाले पाहिजे असा आंबेडकरांचा आग्रह होता. तर म. गांधींचे म्हणणे होते की, समाजाचे हृदयपरिवर्तन होऊन अस्पृश्यता नष्ट व्हायला हवी पण हे

सहजासहजी होणार नाही याची बाबासाहेबांना पूर्ण कल्पना असल्याने गांधीचा समाजाच्या हृदयपरीवर्तनाचा विचार त्यांना पटला नाही. यासाठी त्यांना गांधीशीं संघर्ष करावा लागला. त्यांनी घेतलेला धर्मांतराचा निर्णयही वैफल्य भावनेतून घेतला नसून त्यात त्यांची धर्मनिष्ठाच दिसून येते असे अत्रे म्हणतात. बाबासाहेब हिंदूचे द्वेष्टे नसून द्रष्टे होते. त्यांच्या धर्मांतराच्या मुळाशीही आध्यात्मिक भावनाच अधिक होती. या मृत्युलेखाची भाषा प्रासात्मक असून बाबासाहेबांच्या जीवनकार्याचा व वैचारिक व्यक्तिमत्त्वाचा परिचय या मृत्युलेखातून होतो. देशाच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात बाबासाहेबांचे स्थान किती उच्च होते हे अत्रे अनेक उदाहरणांनी पटवून देतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात विद्वत्ता, ऐहिकता, अध्यात्मिकता धर्मनिष्ठा, देशनिष्ठा, बुद्धीप्रामाण्यवाद, मानवतेची पूजकता यांचा समन्वय असूनही हा महापुरुष भारतीय राजकारणात उपेक्षित राहिला याबद्दल ते खंत व्यक्त करतात. भारताच्या राजकीय, धार्मिक व सामाजिक क्षेत्रात बाबासाहेबांनी मानवतेचा पूजक होऊन जे कार्य केले ते प्रामाणिकपणे अत्यंत प्रांजळ शब्दात अत्र्यांनी व्यक्त केले आहे. ह्या मृत्युलेखातून अत्रे बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे नेत्रदीपक दर्शन घडवतात आणि त्याबरोबरीने राजकारणातील घमेंडी प्रवृत्तींचाही समाचार घेताना दिसतात.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्यावरील 'भारताच्या स्वातंत्र्याचा सरदार' या मृत्युलेखातून अत्र्यांनी वल्लभभाई पटेलांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रभावी दर्शन घडवले आहे. वल्लभभाईंचे व्यक्तिमत्त्व प्रौढ, संयमी व असामान्य असून स्वातंत्र्यप्रेमाचा आणि वीरवृत्तीचा वारसा त्यांच्या घराण्यातच होताते कमालीचे तत्वनिष्ठ आसून त्यांना जिवंतपणी आपल्या मृत्युनंतर देशाची चिंता वाटत होती. अत्र्यांचेसरदारांच्या व्यक्तीमत्त्वाचे निरीक्षण किती बारकाईचे होते याची जाणीव हा मृत्युलेख अभ्यासताना होतो. वल्लभभाईंचे वक्तृत्व आणि व्यक्तिमत्त्व अत्र्यांना क्षणोक्षणी लोकमान्य टिळकांच्या व्यक्तीमत्त्वाची आठवण करून देते. त्यांचा रोखठोक बाणा, त्यांचा म्हणून असलेला दरारा, लढाऊ व उग्र वक्तृत्वाला असलेली विनोदाची विलक्षण धार, लढाऊ, करारी, रागीट, कठोर अशा ह्या पोलादी पुरूषाच्या व्यक्तीमत्त्वाचे विविध पैलू अत्र्यांच्या लेखनातून जाणवतात. सरदारांविषयी काही राजकारणी व्यक्तींनी उगाचच गैरसमज करून घेतल्याने काही अंशी अप्रियतेचा वाटा सरदारांच्या पदरात पडला सरदारांनी देशासाठी सर्वस्वाचा त्याग केला. ते महान देशभक्त व स्वातंत्र्यवीर होते. सदैव त्यांना देशाच्या भवितव्याबद्दल काळजी वाटत असे. देशाच्या सार्वजनिक जीवनाबद्दल ते निराश होते. त्यांना सामर्थ्यवान स्वातंत्र्य हवे होते. अत्रे या लेखात सरदारांच्या धीर गंभीर व्यक्तिमत्त्वाचे मनोज्ञ चित्रण करतात. त्यांच्या जीवनचरित्राबरोबरच त्यांच्या कर्तृत्वावर ही भाष्य करून भारताच्या राजकीय इतिहातील महत्त्वपूर्ण सहयोगाचे मूल्यमापन करून त्यांच्या जीवनातील नाट्यमयतेचे गांभीर्याने चित्रण

करतात. या लेखातून अत्र्यांच्या मनातील सरदारांबद्दलचा नितांत आदर आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रकट चिंतन व्यक्त होते. त्यांच्या व्यक्तित्त्वाप्रमाणेच त्यांचे व्यक्तिमत्त्व ज्या काळात व ज्या पार्श्वभूमीवर घडले त्याचे चित्रण, त्यांचे आर्थिक राजकीय, सामाजीक, विचार व कार्य यांचे विवेचन या मृत्युलेखात आले आहे. त्यांच्या शरीरप्रकृतीच्या वर्णनाप्रमाणेच त्यांच्या वैचारिक व्यक्तिमत्त्वाचे चित्रणही अत्र्यांनी अत्यंत प्रभावीपणे केले आहे.

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंच्या मृत्युनंतर अत्र्यांनी आपल्या ' मराठा' या दैनिकातून त्यांच्यावर 17 अग्रलेख लिहिले. '<u>समाधीवरील अश्रू</u>' या मृत्युलेखसंग्रहात त्यांच्यावरील ' 'रसिकराज नेहरूंस अखेरच प्रणिपात' हा मृत्युलेख नेहरूंच्या व्यक्तित्त्व दर्शनाबरोबरच नेहरूंचे रसिक व्यक्तिमत्त्व व त्यांची जनसामान्यांमधील लोकप्रियता यांचे दर्शन घडविणारा आहे. मृत्युलेखाच्या शीर्षकापासून या लेखात अत्र्यांचा कारूण्य व निस्सीम काव्यमयतेची जाणीव होते. " अत्र्यांच्या या लेखनाला जी काव्यात्मता लाभली आहे. ती त्यांच्या भावबहुल हळुवार मनाच्या स्पंदनातून आली आहे."7 लेखकाच्या सुरूवातीलाच त्यांनी नेहरूंच्या मृत्युपत्रातील मजकुराने लेखाचा आरंभ केला आहे. नेहरूंची अखेरची इच्छा असणारे हे मृत्युपत्र म्हणजे करूणरम्य काव्यच होय. जणू काही त्यांनी आपले सारे जीवनसर्वस्व राष्ट्राला अपर्ण केले आहे. आपल्या मृत्युची नेहरूंना जाणीव झाल्यानंतर त्यांनी मृत्यूपासून पळ काढला नसून साक्षात मृत्युलाच काव्यमयरीतीने आपलेसे केले. याचे हे उत्तम उदाहरण होय. पंडितजींचे जीवन काव्यमय होते. जीवनात त्यांनी रसिकता व खिलाडूवृत्ती जोपासली होती. त्यामुळेच त्यांना अखेरीस मरणाचे देखील भय वाटले नाही. जीवनाच्या आणि राजकारणाच्या रूक्ष व्यवहारात देखील त्यांनी आपल्या रसिकतेचा गुलाब काय टवटवीत ठेवला. जीवनातील सौंदर्याचा शोध घेण्याची वृत्ती त्यांनी अखेर पर्यंत जोपासली. अशा या सौंदर्यपूजक व निसर्गसौंदर्याचे चाहते असणाऱ्या नेहरूंविषयी अत्रे जेव्हा लिहू लागतात तेव्हा नेहरूंचे मुळातले काव्यमय जीवन ते स्वतःच्या काव्यमय शैलीत रंगवतात. नेहरू जिवंत असताना अत्र्यांना नेहरूंची राजकारणातील काही धोरणे पटली नाहीत. इतर काही व्यक्तींवरील मृत्युलेखांमध्ये अत्र्यांनी नेहरूंच्या राजकीय व्यक्तिमत्त्वाबद्दल सडेतोडपणे लेखन केले आहे. परंतु ते जेव्हा नेहरूंवर मृत्युलेख लिहितात तेव्हा ते नेहरूंच्या राजकारणापासून ते वाङ्मयापर्यंत विविध कलांमध्ये व खेळामध्ये त्यांच्या रसिकतेचे रम्य दर्शन कशाप्रकारे होते ते सांगतात. या लेखाची भाषाशैली म्हणजे अत्र्यांच्या काव्यमय भाषेचा एक उत्तम नमुना असून तिला नेहरूंच्या काव्यमय रसिकवृत्तीची जोडमिळाल्यामुळे अधिक बहारदार झाली आहे. नेहरूंविषयी वाटणारा भावनेचा ओलावा अत्र्यांनी काव्यमय व नाटयमय पध्दतीने चित्रित केला आहे. त्यामुळे हा लेख सरळसरळ वाचकांच्या काळजाला भिडतो आणि त्यातून अत्र्यांचेही व्यक्तिमत्त्व स्पष्टपणे कळून येते. हा मृत्युलेख म्हणजे अत्र्यांनी नेहरूंच्या रसिक मनोवृत्तीचा काढलेला काव्यमय

आलेख होय.

पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्यावरील ' इतका लहान एवढा महान ' या मृत्युलेखातून आचार्य अत्र्यांनी शास्त्रीजींच्या देशाच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण काळातील मोलाच्या कामगिरीचे मूल्यमापन केले आहे. शास्त्रीजींनी देशाची नेमकी निकड ओळखून त्यांनामिळालेल्या अल्पावधीच्या काळातील देशाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय कशा प्रकारे घेतले व त्यामुळे व्यक्तिगत जीवनात छोटे असणारे शास्त्रीजींचे व्यक्तिमत्त्व देशाच्या दृष्टीने कसे मोठे ठरले हेही सांगितले आहे. त्याच बरोबरीने शास्त्रीजींच्या जीवनाचे विविध अंगीदर्शनही घडवले आहे. देशाच्या राजकीय इतिहासात जे अनेक महापुरूष झाले त्यांच्याहून शास्त्रीजींचे व्यक्तिमत्त्व निश्चितच वेगळे होते याची जाणीव अत्र्यांना झालेली आहे. शास्त्रीजींचे द्रष्टेपण सांगत असताना देशाच्या दृष्टीने नेहरू, गांधीच्या ज्या चुका झाल्या त्या शास्त्रींनी कशाप्रकारे सुधारल्या हे देखील ते सांगतात. गांधी नेहरूंनी उगाचच अहिंसेचे स्तोम माजवल्यामुळे देशाला दुबळेपण येऊन नेहरूंच्या कारकीर्दीत चीनने केलेल्या आक्रमणामध्ये भारताला पराभव पत्करावा लागला. देशाचे लष्करीसामर्थ्य आणि आर्थिक जीवन धोक्यात आले ते नेहरूंच्या चुकीच्या निर्णयामुळेच असे अत्रे स्पष्टपणे म्हणतात. व नेहरूंपेक्षा शास्त्रीजींचे क्रांतीकारकत्त्व देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने कसे योग्य ठरले यावरही ते भाष्य करतात. शास्त्रींनी केवळ शांततेचा बडेजाव न करता ठोशास ठोसा देण्याची वृत्ती अंगी बाणली. "जे गांधींनी ओळखले नाही, नेहरुंना जमले नाही, ते फक्त शास्त्रीजींनीच आकळिले. म्हणून 'जय जवान' हा महामंत्र राष्ट्राला देण्याचा अधिकार केवळ त्यांनाच एकटयांना पोहचतो."[8] असे शास्त्रींबद्दलच्या रास्त अभिमानाने अत्रे म्हणतात. देशाचे संरक्षण आणि अन्नधान्याची पूर्णता यासाठीच शास्त्रींनी 'जय जवान जय किसान' हा महामंत्र दिला. देशाला निव्वळ पोकळपणाने 'सुजलाम् सुफलाम्' म्हणण्यात काही अर्थ नाही. हे शास्त्रींजीनींच ओळखले व त्यानुसार त्यांनी ठोस पाउलेही उचलली. 'जय जवान' म्हणून त्यांनी पाकिस्तानवर विजय मिळविला पण त्याचबरोबरीने 'जय किसान' अशीही घोषणा करुन शेतक-यांनी देशातील जमिनी उत्तम रितीने पिकवाव्यात असे आवाहन केले. त्यांना रणगाडयांइतकेच ट्रॅक्टरांचे देखील महत्त्व कळाले होते. या मृत्युलेखांत अत्र्यांनी शास्त्रीजींचा जनसामान्यांवरील प्रभाव, त्यांचा द्रष्टेपणा व प्रामाणिकपणा, विचार आचारांमधील समन्वय, तसेच त्यांची चिमुकली शरीर प्रकृती यावर भाष्य केले आहे. शास्त्रींजींच्या राजकारणाची बाजू पटवून देत असताना त्यांच्या आधीच्या राज्यकर्त्यांची चुकीची धोरणे ते सडेतोडपणे सांगतात. शास्त्रीजींचे गुणवर्णन व कर्तृत्व यावर भाष्य करताना लेखाची भाषा चित्रमय व काव्यमय होते तर देशाच्या

दृष्टीने अहितकारी प्रवृत्तींचा समाचार घेताना कमालीची सडेतोड होते. शास्त्रीजींच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल अत्र्यांना कमालीची निष्ठा आहे. त्यामुळे ही निष्ठा व्यक्त होत असताना लेखात मृदता व परिणामकारकता येते. शास्त्रीजींनी अल्पावधीत केलेले महत्त्वपूर्ण कार्य व देशाच्या स्वयंपूर्णतेच्या दृष्टीने त्यांचे नेमके विचार किती महत्त्वपूर्ण होते याची कल्पना येते. त्यांच्या शरीरप्रकृतीपासून ते त्यांच्या महत्त्वपूर्ण कार्याचे ते यथोचित दर्शन घडवतात. अगदी साध्या क्षुल्लक माणसासारखा वाटणारा हा छोटा मनुष्य देशाच्या दृष्टीने खरोखरच मोठा होता याची साक्ष हा लेख देतो.

'स्वातंत्र्यवीराचे आत्मार्पण' हा स्वातंत्रवीर वि. दा. सावरकरांवरील मृत्युलेख देशाच्या राजकारणावरील आणि समाजकारणावरील सावरकरांचा प्रभाव किती लक्षणीय होता याचे उदाहरण होय. सावरकर हे नुसते क्रांतीकारक नव्हते तर ते देशाच्या इतिहासातील चमत्कार होते. त्यांचे जीवन म्हणजे खरोखरच एक महाकाव्य होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व एकांगी नसून अनेकांगी होते. ते जसे क्रांतीकारक होते तसेच कवी होते, कादंबरीकार होते, नाटककार होते, कथाकार व निबंधकारही होते. त्यांच्या शौर्याने आणि पराक्रमाचे वर्णन करताना अत्र्यांच्या लेखणीला विलक्षण तेज येते. त्यांच्या अनेकांगी व्यक्तिमत्त्वाबद्दल ते म्हणतात, "अग्निरसाच्या कारंज्याप्रमाणे स्वातंत्र्याची ज्वलजहाल काव्ये सावरकरांच्या अलौकिक प्रतिभेतून उचंबळू लागली."[9] मात्र स्वातंत्र्योत्तर काळात व कॉंग्रेसच्या राज्यात सावरकरांना काही किंमत तर राहिली नाहीच उलट गांधीजींचे खुनी म्हणून सरकारने त्यांची नको तितकी मानहानी केली. म्हणूनचकी काय अनेक महापुरूषांनी जसे आत्मार्पण केले.तसेच सावरकरांनी देखील प्रायोपवेशन करून आत्मार्पण केले असे अत्र्यांना वाटते. सावरकरांबद्दल त्यांच्या मनात नितांत आदर आहे. या लेखात ते सावरकरांच्या केवळ राजकीय व्यक्तिमत्त्वावर भाष्य न करता त्यांच्या काळातील सर्व क्रांतीकारकांहून ते कसे वेगळे होते. यावर भाष्य करतात. त्यामुळे या लेखनास जिवतपणा व रसरशीतपणा प्राप्त झाला आहे. सावरकरांच्या जीवनातील काव्याचा आणि देदीप्यमान इतिहासाचा ते वेध घेतात. मृत्युलेखाची भाषा ठाशीव उत्कट आणि उठावदार गंभीर व गतिमान आहे. अत्रे सावरकरांना महापुरूषांच्या आणि साधूसंताच्या योग्यतेचे स्थान देतात. कोणत्याही प्रकारची अतिशयोक्ती दिसत नाही. उलट सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाची ती वास्तविक योग्यताच कशी होती हे स्पष्ट शब्दात सांगतात तेव्हा भाषेतील सूक्ष्मतेची व तरलतेची जाणीव होते.

' भारताचा विनोदसम्राट' हा होमी मोदी यांच्या वरील मृत्युलेख खेळकर व हसऱ्या शैलीत खिलाडू वृत्तीने रंगविला आहे. लेखात भाषा कोठेही गंभीर होत नाही. की भावविवशता नाही. तरी देखील मोदींच्या आठवणी, किस्से चुटके दिलखुलासपणे सांगताना अत्र्यांच्या मनातील मोदींबद्दलचा

नितांत आदर व्यक्त होतो. मोदींचा भारतीय राजकारणाशी असणारा संबंध, त्यांच्या आठवणी, किस्से, चुटके अत्र्यांनी दिलखुलासपणे व खिलाडू वृत्तीने सांगितले आहेत. मृत्युलेखाचे लेखन गप्पा माराव्यात अशा स्वरुपाचे आहे. भाषेत गांभीर्य अथवा भावविवशतेची जाणीव होत नाही. उलट स्वाभाविक हसरेपणा तसेच वक्तृत्वाची छटाही प्राप्त झाली आहे.

जनसंघाचे नेते पं. दीनदयाळजी उपाध्याय यांच्या निधनानंतर एक वर्षाने त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त लिहिलेल्या मृत्युलेखाचे स्वरुप त्यांच्या राजकीय व सामाजिक जीवनातील कार्याच्या माहितीपर स्वरुपाचे आहे. या निमित्ताने अत्र्यांनी दीनदयाळजींच्या पुरोगामी विचारसरणीचा आर्थिक व आध्यात्मिक विचारांचा मागोवा घेतलेला आहे. ह्या लेखात व्यक्तित्त्व दर्शनापेक्षा त्यांच्या वैचारिक विकासाच्या दर्शनावरच अत्रे भर देतात.

भारतीय ऐक्याचे नेतृत्त्व करणारे जनसंघाचे एक नेते शामा प्रसाद मुकर्जी यांच्यावरील मृत्युलेखात अत्र्यांनी भारतीय ऐक्य टिकविण्याच्या बाबतीत श्यामाप्रसाद मुकर्जींचा सहयोग किती महत्त्वपूर्ण होता हे सांगत असतानाच त्यांना हे कार्य करताना मतलबी राजकारण्यांनी कशाप्रकारे त्रास दिला व त्यांचा मृत्युदेखील काश्मीर सरकारच्या आडमुठया धोरणामुळेच झाला असा काश्मीर सरकारवर ठपका ठेवला आहे. श्यामाप्रसादांच्या अलौकिक कर्तृत्त्वावर भाष्य करताना कॉंग्रेसमधील मतलबी मंडळीवर ओरखाडे ओढून कडाडून प्रहार करतात. लेखाची भाषा श्यामाप्रसादांचे गुणवर्णन करताना सहजसरळ, उत्कट झाली असून त्यांच्या व्यक्तिमत्वाचे चिंतन करताना काव्यमय झाली आहे. तसेच श्यामाप्रसादांच्या विरोधकांबद्दल ते कमालीच्या सडेतोडपणे भाष्य करतात.

अत्र्यांच्या मृत्युलेख लेखनास कोणत्याही व्यक्तीचे वावडे नाही. देशविदेशातील कित्येक व्यक्तींवर त्यांनी स्मरणीय मृत्युलेख लिहिलेले आहेत. गेलेल्या व्यक्तीशी संबंध असो वा नसो. त्या व्यक्तीवर मृत्युलेख लिहिताना ते तिचे यथार्थ मूल्यमापन करतात. पाकिस्तानचे गर्व्हनर जनरल 'मरहूम महमद अली जिना' हे व्यक्तिमत्त्व भारताच्या राजकीय इतिहासाच्या दृष्टीने घरभेदी व्यक्तिमत्त्व. असे हे घरभेदी व्यक्तिमत्त्व मरण पावले ही गोष्ट भारताच्या दृष्टीने चांगली की वाईट यावर अत्रे चर्चा न करता म्हणतात, "ऐतिहासिक व्यक्तीच्या मरणाकडे वैयक्तिक किंवा घरगुती दृष्टीने पाहावयाचे नसते."[10] यामधून त्यांचा व्यक्तीकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. त्याचबरोबर या मृत्युलेखाच्या लेखनातून अत्र्यांच्या स्पष्टवक्तेपणाची व सच्चेपणाची कल्पना येते. ते कोणताही खोटा अविर्भाव किंवा सजावटीपणा आणत नाहीत. "मनुष्य मेल्यानंतर त्याबद्दल वाईट लिहू नये, अशी एक सभ्य रीत आहे. ती जरी आम्हांला मान्य असली तरी मनुष्य मेल्यानंतर खोटे लिहिणे हेही पण काही फारसे सभ्यपणाचे होणार नाही."[11] असा स्पष्ट निर्वाळा देऊन जिनांबद्दल प्रामाणिक मत ते मांडताना दिसतात. त्यांची घमेंडी वृत्ती, जातीय दंगलीमागील बेजबाबदारीची भूमिका, भोंगळ धर्मवेडेपणा

अत्याच्यारीभूमिका , ज्वलंत राष्ट्रवादी असूनही कट्टर जातीवादी तत्त्वशून्य व पोकळ धर्माभिमान, हिणकस मनोवृत्ती इत्यादी बाबींवर स्पष्टपणे भाष्य करून जिनांची नेमकी जागा आणि लायकी काय होती ते अत्रे दाखवतात. ह्या मृत्युलेखाचे वेगळेपण चटकण नजरेत भरते ते अत्र्यांच्या रोखठोक लेखणीमुळे या व्यक्तिमत्त्वाशी राजकीय संबंधच वेगळे पडल्याने लेखकाच्या रीतीतही ते जाणवते. ते उगाच उदोउदो न करता व्यक्तीचे यर्थाथ मूल्यमापन करतात. व्यक्तिगत जीवनापेक्षा राजकीय इतिहासाचा विवेचक शोध घेताना दिसतात. आवश्यकतेनुसार टीकेची झोड ही उठवतात. ठशीव भाषेत स्पष्ट मत प्रदर्शन करतात. अशावेळी भाषेला आपोआपच धार येते. हा लेख पूर्णपणे दोषांचे दिग्दर्शन करणारा असूनही तो व्यक्तित्त्वदर्शन व राजकीयेच्या दर्शनाच्या दृष्टीने चांगला वठलेला आहे. जिना हे एकूण व्यक्तिमत्त्वाच अत्र्यांना तिरस्कारणीय वाटल्याने त्यांना जसे वाटले तसे त्यांनी चित्रण केले आहे. विन्स्टन चर्चिल' सारखे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे व्यक्तिमत्त्व जेव्हा अत्र्यांच्या लेखणीचा विषय बनते तेव्हा गुणग्राहकतेच्या दृष्टिकोनातून त्यांच्याकडे पाहतात. चर्चिलवरील मृत्युलेखात अत्रे चर्चिलच्या जीवन चरित्राचे दर्शन घडवत असताना त्याच्या व्यक्तिमत्त्वातील त्यांना भावलेल्या निरनिराळया पैलूंवर भाष्य करतात, चर्चिल बेडर, झुंजार, अवखळ, आग्रही, तडफदार, तसाच विनोदी व भाषाप्रभूदेखील होता हे वेगवेगळी उदाहरणे देऊन पटवून देतात. त्यांच्या महत्त्वाकांक्षी व रसिकतेसंबंधी ते लिहितात " तो जर साडेतीनशे – चारशे वर्षापूर्वी राणी एलिझाबेथच्या कारकीर्दीमध्ये जन्माला आला पोलादी चिलखत नि शिरस्त्राण चढवून त्याने देशोदेशी दिग्विजय करीत ब्रिटीश साम्राज्याचा विस्तार वाढवला असता. त्याचप्रमाणे राणीच्या दरबारामधला एक मुत्सद्दी रगेल नि रंगेल सरदार म्हणून तो गाजला असता. पण दुर्दैवाने चर्चिलचा जन्म ब्रिटीश साम्राज्याच्या अस्तकाली झाला.[12] यावरून चर्चिलच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल अत्र्यांना किती नितांत आदर आहे याची कल्पना येते. उमेद, रसिक, भाषाप्रभू व्यक्तिमत्त्व अत्र्यांच्या रसिक मनाला भावले आहे त्यामुळे चर्चिलच्या व्यक्तिमत्त्वावर ते मोठया वैशिष्ठ्यपूर्णतेने व रसिकतेने भाष्य करतात.

अत्र्यांनी केवळ भारतातील लोकांवरच मृत्युलेख लिहिले नाहीत तर याबाबतीत त्यांनी आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडल्या आहेत. त्यांनी जसे आपल्या परीचित व्यक्तींच्या मृत्युनिमित्ताने मृत्युलेख लिहिले तसेच जी व्यक्तिमत्त्वे त्यांना व्यक्तिगत जीवनात अपरिचीत होती पण इतर क्षेत्रान्वये परीचित होती अशा व्यक्तींवरही यशस्वी व परिणामकारक मृत्युलेखांचे लेखन केले. 'राज्य न करणारा इंग्लडचा राजा' ह्या इंग्लडचे राजे सहावे जॉर्ज यांच्यावरील मृत्युलेखातून अत्र्यांचे जागतिक पातळीवरील व्यक्तींबद्दलचे अवलोकन किती सूक्ष्म होते याचे प्रत्यंतर येते. ब्रिटीश राजाच्या मृत्यूवर मृत्युलेख लिहिण्याच्या निमित्ताने ब्रिटीश राजघराण्याचा इतिहास परंपरा व संस्कृतीची अत्र्यांनी चर्चा केली आहे. तसेच ब्रिटीश जनतेचा सूज्ञपणा, संयमी स्वभाव व ब्रिटीश लोकशाहीवरही ते चर्चा

:ৎ

करतात." 'राजा हा जगाचा उपभोगशून्य स्वामी आहे.' ही व्याख्या केवळ ब्रिटीश राजालाच लागू पडण्यासारखी आहे."[13] या वर्णनावरुन ब्रिटीश राजाचे स्थान नगण्य असूनही किती अग्रगण्य आहे याची कल्पना येते. यानिमित्ताने अत्रे इंग्लडच्या उपभोगशून्य राजाशी आपल्या भोगविलासी भारतीय राजांची तुलना करतात. यामुळे भारतीयांना आपले आत्मपरीक्षण करण्याची किती निकड आहे याची कल्पना हा मृत्युलेख अभ्यासताना येते. ब्रिटीशांच्या राजकीय व राष्ट्रीय चारित्र्यावर भाष्य करताना ते भारतीयांच्या ओंगळ व विकृत परंपरावरही भाष्य करतात. या मृत्युलेखात राजाच्या व्यक्तित्त्वदर्शनापेक्षा ब्रिटीश राजेशाही व लोकशाहीशी भारताची वेळोवेळी अत्रे तुलना करताना दिसतात. लेखात भाषेच्या सरळपणाबरोबर सूक्ष्म वर्णनशैलीचे प्रत्यंतर येते.

राजकीय व्यक्तींवरील मृत्युलेखांमधून अत्र्यांनी त्या त्या व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाचे देदिप्यमान दर्शन घडवले आहे. त्या व्यक्तीच्या व्यक्तिगत चित्रणाबरोबरच तिचा राजकारणाशी असणारा संबंध, तिचे कार्य, जनसामान्यांवरील तिचा ठसा याचे दर्शन ते घडवतात. यासाठी व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे व कार्याचे चिंतन असावे लागते ते चिंतन अत्र्यांजवळ आहे. भारतीय राजकारणातील व्यक्तींबरोबर आंतरराष्ट्रीय राजकारणातील व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाचा व कार्याचा अत्र्यांचा सूक्ष्म अभ्यास दिसून येतो. व्यक्तीच्या जीवनातील माहितीच्या तपशीलांबरोबर त्या काळाचे संदर्भही ते देतात. व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनातील काही घटना, प्रसंग यांच्या अनुषंगाने तिचे व्यक्तिमत्त्व दर्शन घडवतात व तिचे वेगळेपण दर्शवतात. जीवन चारित्र्यावर भाष्य करीत ते व्यक्तीच्या कर्तृत्वावर भाष्य करतात. तिचा देशाच्या राजकीय इतिहासातील महत्त्वपूर्ण सहयोगाचे मूल्यमापन करुन त्यांच्या जीवनातील नाटयमयतेचे कधी गंभीरपणे तर कधी खेळकरपणे चित्रण करतात. त्यांच्या मनात व्यक्तीबद्दल असणारा आदर तर व्यक्त होतोच पण एखाद्या व्यक्तीबद्दलचा अनादर व्यक्त करीत असतानादेखील आचार्य अत्रे तेवढयाच स्वाभाविकपणे व्यक्त करतात. ते व्यक्तिमत्त्व ज्या काळात व ज्या पार्श्वभूमीवर घडले त्याचे चित्रण येते. तसेच व्यक्तीच्या कार्याच्या अनुषंगाने आर्थिक, राजकीय व सामाजिकतेचेही दर्शन ते घडवतात. तुलना करणे हाही अत्र्यांचा स्वभाव आहे. ते व्यक्तीची तिच्या क्षेत्रातील इतर व्यक्तींशी तुलना करुन तिच्या उजवेपणाबद्दल कौतुक करतात. त्यामुळे हे चित्रण एकांगी होत नाही तर मृत्युलेखातून व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचे दर्शन घडते. व्यक्तीचे चित्रण जिवंतपणे होते. त्यात रुक्षता येत नाही. व्यक्तीशी संबंधित वाचकाला रुक्ष वाटेल असा मजकूर ते कटाक्षाने टाळतात व समर्थपणे व्यक्ती उभी करतात. ह्या अनुषंगाने अत्र्यांचेही सामाजिक, राजकीय विचार व्यक्त होतात. शिवाय मृत्युलेख ज्या व्यक्तीवर आहे त्या व्यक्तीचे विचार, जीवनमूल्ये, सामाजिक व्यक्तिमत्त्वाचा बोध होतो.

2) **साहित्यिक क्षेत्रातील व्यक्तींवरील मृत्युलेख –**

साहित्यसम्राट न. चिं. केळकर, साने गुरुजी आणि जॉर्ज बर्नार्ड शॉ या तीन साहित्यिक क्षेत्रातील व्यक्तींवरील मृत्युलेखांमधून अत्र्यांनी त्या व्यक्तींच्या व्यक्तिदर्शनाबरोबरच वाङ्‌मयीन व्यक्तित्त्वांचांही वेध घेतला आहे.

'महाराष्ट्राच्या सम्राटाचे निर्याण !' हा साहित्यसम्राट न. चिं. केळकर तथा तात्यासाहेब केळकरांवरील मृत्युलेख म्हणजे तात्यासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेकांगी चित्रणाचा एक नमुना होय. तात्यासाहेबांशी अत्र्यांचा अनेक वेळा प्रत्यक्ष संबंध आल्याने त्यांनी त्यांच्या जीवनातील काही महत्त्वपूर्ण आठवणींच्या माध्यमातून हा लेख लिहिला आहे. तात्यासाहेबांच्या संयमी व समतोल मनोवृत्तीमुळे ते जनसामान्यांमध्ये प्रिय झाले होते. त्यांच्या नित्याच्या सवयींपासून ते त्यांच्या आनंदी, आशावादी, प्रेमळ व शीतल व्यक्तिमत्त्वाचे व विलक्षण तेजस्वी बुद्धिमत्तेचे ते चित्रण करतात. या लेखात तात्यासाहेबांबद्दलचा जसा भावनिक ओलावा आहे त्याचप्रमाणे त्यांच्या शरीर प्रकृतीचेही ढंगदार वर्णन ते करतात. त्यांच्याबद्दलच्या भावविवशतेबरोबरच त्यांच्या प्रौढ व संयमी व्यक्तिमत्त्वाचे प्रभावी दर्शन ते घडवतात. तात्यासाहेबांच्या कर्तृत्वाने अत्रे एवढे भारावून गेले आहेत की, त्यांची पत्रकारिता, नाटयलेखन, विनोदी शैली यांची तुलना त्या त्या क्षेत्रातील तत्कालीन अग्रगण्य व्यक्तींशी करुन त्यांच्याहून केळकरांचे कर्तृत्व कसे सरस होते ते स्पष्ट करतात. केळकरांची नाटयशैली खाडिलकरांपेक्षा जास्त मोहक व काव्यमय आहे. विनोदी आहे असा निर्वाळा ते देतात. त्यांच्या विनोदाची तुलना कोल्हटकरांच्या विनोदाशी करुन कोल्हटकरांच्या विनोदातील "कृत्रिमता, क्लिष्टता, केळकरांच्या नाटयविनोदात औषधालाही नसून त्यांचा विनोद घरगुती, मनमोकळा व प्रासादिक असे. इतकेच काय नव्हे तर त्यांची लो. टिळकांशी तुलना करताना अत्रे म्हणतात, "केळकर हे टिळकांसारखे तेजस्वी आणि खंबीर नसतील, पण ते टिळकांपेक्षा खचित जास्त व्यवहारी होते. टिळक उग्र होते. लोकांना त्यांचे भय वाटे. ते खेळीमेळीने जनतेमध्ये मिसळू शकत नसत. त्यांच्या उलट केळकरांचा स्वभाव होता. त्यांची आनंदी आणि खेळकर वृत्ती त्यांना याबाबतीत फार उपकारक ठरली. सूर्याचे बिंब जसे काळया काचेमधून पाहावे लागते तसे टिळकांचे स्वरुप समजावून घेण्यासाठी लोकांना केळकरांच्या सौम्य भिंगामधून पाहणेच सोयीचे पडू लागले."[14] लेखाची भाषा काव्यमय तर आहेच. शिवाय तिच्यात प्रासात्मकते बरोबर संवेदनशीलता व सरलता दिसून येते. या भाषेला रसरशीतपणा व जिवंतपणा असल्याने तात्यासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाला जिवंतपणा प्राप्त झाला आहे.

साने गुरुजींवरील 'मृत्यूचे चुंबन घेणारा महाकवी' हा मृत्युलेख म्हणजे साने गुरूजींनी केलेला देहत्याग अत्र्यांच्या मनाला किती खोलवर भिडला असावा याचे उदाहरण होय" गुरूजींच्या जीवनाचे आणि वाड्.मयाचे अत्यंत भावगर्भ आणि सौंदर्यदायी विवेचन अत्र्यांच्या गुरूजींशी झालेल्या समरसतेचे साक्षी आहे. येथे शोक नाही. विलाप नाही. 'मृत्युंजय ' तत्वज्ञानाच्या धीरोदात्ततेचे वलय या लेखाभोवती आहे.[15] साने गुरूजींच्या मृत्युप्रसंगी त्यांचे जीवन, मरण, लेखन, भाषण त्यांचे संस्कारक्ष व्यक्तिमत्व या सबंधी गुरूजींचे अत्यंत मैलिक विचार सांगून त्याद्वारे त्यांचे जीवन, व्यक्तिमत्व व वाड्.मय यातील पैलूंचे दर्शन अत्र्यांनी घडवीले आहे. जगतावर संस्कार करणे हीच जणू त्यांची जीवन प्रेरणा होती. जगाविषयी निर्हेतूक व आत्यंतिक प्रेमाचा उमाळा गुरुजींजवळ होता. जगाच्या सुखासाठी सर्वस्व अपर्ण करणे यातच जीवनाची खरी पूर्तता माननारे तुकारामानंतर होऊन गेलेले साने गुरूजीं हे खरोखरच महाकवी होते. दलितांच्या मंदिर प्रवेशासाठी त्यांनी केलेले प्राणांतिक उपोषण गरीबांच्या दुःख निवारण्यासाठी त्यांची एकसारखी चाललेली धडपड, जीवनाइतकेच मरणावरही प्रेम करणारे साने गुरूजी एकटेच विद्यार्थ्यांवर संस्कार करणारे त्यांचे वाड्.मय म्हणजे जणू गुरूजींनी सांगितलेली मंगलमय वचने होत. गुरूजींचे जीवन म्हणजे मातृप्रेमाची गंगाच होती. गुरूजींचे जग जगावेगळे होते. त्यांचे सारे सामर्थ्य त्यांच्या अश्रूत होते. अश्रू हा त्यांचा नारायण होता. मात्र त्यांच्या अश्रूंचा दुबळेपणा आणि रडकेपणा असा उपहास झाला. वैराण वाळवंटात आणि माणसांच्या हृदयात प्रेमाचे मळे पिकवण्याचे सामर्थ्य अश्रूत आहे. असा गुरूजींचा विश्वास होता. गुरूजींच्या शब्दांनी, विचारांनी, संस्कारांनी अत्र्यांचे अवघे भावजीवन भारावून गेले होते. म्हणूनच ते गुरूजींच्या जाण्याने गुरूजींच्या जाण्याने गुरूजींच्या जीवन मरणाशी संबधित अशा अनेक बाबांचे चिंतन करीत राहातात व या चिंतनामधून गुरूजींचे भावचित्र साकार करत जातात. मातृहृदयाच्या गुरूजींनी अखेरीस स्वतःहोऊन मृत्यूच्या गळयात हात घालून त्याचे कडकडून चुंबन घेतले. त्यांचे जीवनाएवढेच मरणावरही प्रेम असल्याने त्यांनी मृत्यूला कवटाळले. जीवनातील सौंदर्य आणि रमणीयता मृत्युमुळेच निर्माण झाली आहे. असे ते म्हणत. मरण म्हणजे माहेरी जायचे, जगन्माऊलीला भेटायचे. अनंतात जाऊन यथेच्छ डुंबायचे, जीवाशिवायची भेट करून देणारी मरण ही एक पौर्णिमा आहे. असा मृत्युविषयी गुरूजींचा काव्यमय दृष्टिकोन अत्रे व्यक्त करतात. गुरूजींच्या देहत्यागामुळे अत्र्यांच्या मनात निर्माण झालेले भावनिक हेलकावे ह्या लेखातील शब्दाशब्दांमधून जाणवतात. तसेच अत्र्यांच्या मनातील गुरूजीविषयीचा आदर ही व्यक्त होतो. अतिशय शांतपणे त्यांनी गुरूजींच्या मृत्युविषयी वाटणारे अपार कारूण्य आणि त्यांच्या जीवनाविषयक तत्वज्ञानाचे अपार भावलावण्य यांचा सुरेख संगम साधला आहे. त्यामुळे ह्या मृत्युलेखाचे स्वरूप केवळ तत्कालिक न राहता गुरूंजींच्या स्मृती दीर्घकाळ मनात रेंगाळत राहतात.

गुरूजींच्या प्रौढ, संयमी व सोशीक मनोवृत्तीचे प्रत्यंतर हा मृत्युलेख अभ्यासताना जाणवते. साने गुरूजींवरील हा मृत्युलेख अत्र्यांच्या भावस्पर्शी लेखणीमुळे स्मरणीय झाला आहे.

आंतरराष्ट्रीय कीर्तीचा नाटककार ' जार्ज बर्नार्ड शॉ ' यांच्या वरील ' स्टॅलिन आणि बुध्द यांचा उपासक' ह्या मृत्युलेखात शॉच्या वाड्.मयीन सामाजिक आणि व्यक्तिगत जीवनाचे प्रभावी दर्शन घडते. शॉ बद्दलची मार्मिकता आस्थेवाईकता, आत्मीयता आणि प्रसन्नता याच बरोबर शॉच्या उत्तुंग प्रतिभेचा, बुध्दिमत्तेचा, जीवनविषयक श्रध्देचा, भेदक व वक्रोक्तीपूर्ण प्रभावी वक्तव्याचा, त्यांच्या जीवनकार्याचा आणि तत्त्वचिंतनाचा वेधक परिचय अत्रे करून देतात.मृत्यु जेव्हा कलावंतावर घाव घालतो तेव्हा फार झाले तर त्याचे मृत शरीरच काळाच्या हाती लागले. कलावंताने आपल्या कलाकृतींचा रूपाने जनमाणसात अमरत्व प्राप्त केलेले असते. बर्नार्ड शॉच्या मृत्यूमुळे जरी त्याचे शारीरिक अस्तित्त्व संपले असले तरीदेखील त्याचे वाड्.मय आणि विचार अमर आहेत. शॉ हा केवळ नाटककार नव्हता तर तो सुधारक होता. मानवतेचा एक महान मित्र होता. महान द्रष्टा होता. आपल्या वाड्.मयात त्याने समाजसत्तावाद पुरस्कृत केला. तो दंभाचा आणि ढोंगाचा महान शत्रू होता. जीवनातील मूर्खपणा आणि ढोंगे नष्ट व्हावीत ही त्याची अहर्निश तळमळ होती म्हणून अत्र्यांना शॉ. स्टॅलिन आणि बुद्ध यांचा उपासक वाटतो.

साहित्यिक क्षेत्रातील व्यक्तींवरील मृत्युलेखांमधून अत्र्यांच्या व्यासंगी व्यक्तिमत्वाचे व वाड्.मयीन गुणवत्तेचे प्रत्यंतर येते. त्याचप्रमाणे ते व्यक्तीची साहित्यनिष्ठा, सामाजिकता याचबरोबर व्यक्तिमत्वाची व त्यांच्या वाड्.मयाची विलोभनीय वैशिष्टये नमूद करीत जातात. भावनिकता, वैचारिकता, सामाजिकता, वाड्.मयीनमहत्त्व यांचा समन्वय या लेखनात झाला आहे.

### 3) सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्तींवरील मृत्युलेख –

'वॉल्ट डिस्ने' 'तात्या गेले आठवणी राहिल्या' आणि 'महर्षींचे स्वर्गारोहण' ह्या तीन सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्तींवरील मृत्युलेखांतून अत्र्यांनी सांस्कृतिक कार्याचे दर्शन घडवले आहे. तसेच आठवणींच्या माध्यमातूनही लेखन खुलवले आहे.

अत्र्यांनी मृत्युलेख लिहिताना देशविदेशाच्या सीमांचे बंधन ठेवले नाही. त्यांनी आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या काही व्यक्तींवर मृत्युलेख लिहिले त्यापैकी 'वॉल्ट डिस्ने' ह्या जगप्रसिद्ध व्यंगचित्रपटकारावरील लेख परिचयवजा वजा आहे. यात भावनिकता अथवा भावविवशतेचा प्रत्यय येत नाही. एकंदरीत डिस्नेच्या व्यंगचित्रपट क्षेत्रातील महत्त्वपूर्ण कामगिरीचाच सर्व लेखात परिचय करुन दिला असल्याने अत्र्यांची नेहमीची शैली येथे दिसत नाही. किंबहुना या लेखास अत्रेय स्पर्शही

जाणवत नाही. भाषेच्या बाबतीतही भाषा सहज सरळ व सुलभ असून कोणत्याही प्रकारची नाटयमयता व काव्यमयता आढळत नाही.

अत्र्यांनी समाजातील विविध स्तरांमधील लोकांवर वैविध्यपूर्ण मृत्युलेख लिहिले. 'तात्या गेले आठवणी राहिल्या. 'ह्या सेनापती बापटांवरील मृत्युलेखातून आठवणींच्या स्वरुपात बापटांच्या जीवनाचा, कार्याचा, कर्तृत्वाचा व स्वभावाचा आढावा घेतलेला आहे. सेनापतींच्या आठवणी सांगत असताना त्यांच्या पोषाखाचे आणि शरीरप्रकृतीचेही ते वर्णन करतात. अत्र्यांचा सेनापतींशी वेळोवेळी प्रत्यक्ष संबंध आल्याने ह्या आठवणीवजा मृत्युलेखात भावनिक ओलावा आला आहे. सेनापतींच्या व्यक्तिमत्त्वाचे नेमके दर्शन येथे घडते. त्यांची त्यागी व उदार वृत्ती, रसिकता, जनसंपर्क वाढविण्याची वृत्ती, अस्पृश्योद्धारासाठी घेतलेला पुढाकार, सेवाभाव, संयम, परोपकारी वृत्ती, नेतृत्वाची वृत्ती, तत्त्वनिष्ठा, चळवळींमधील हिरीरीचा सहभाग, वागण्याबोलण्यातला सहजपणा व साधेपणा, कोणालाही जीव लावण्याची वृत्ती यामुळे कोणालाही जीवाभावाचे वाटावे असे हे व्यक्तिमत्त्व होते. हे व्यक्तिमत्त्व अत्र्यांच्या अंतर्मनाला भावले आहे. लेखाची भाषा चिंतनशील असून सेनापती बापटांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दलची निष्ठा ओळीओळीतून स्पष्ट होताना जाणवते. आठवणी सांगत असताना आशयाचा सूक्ष्मपणा व उठावदारपणा जाणवतो. सुबोधपणा व आकर्षकपणाचे प्रत्यंतर या लेखात येते. मात्र ' महर्षींचे स्वर्गारोहण ' ह्या अण्णासाहेब कर्वे यांच्यावरील मृत्युलेखात अत्र्यांच्या वैशिष्ट्यपूर्णतेचे दर्शन घडत नाही. केवळ कर्व्यांच्या मृत्यूची दखल घेण्याच्या उद्देशाने ह्या छोटयाशा मृत्युलेखात ते त्यांच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतात.

" समाधीवरील अश्रू' संख्येने थोडे असले, तरी त्यांची समाजमनाला हलविण्याची ताकत प्रचंड आहे. ते सार्थ गुणगान आहे. थोरांच्या कर्तृत्वाचा भावोत्कट स्थितीत करून दिलेला परिचय आहे. कुठे धीरोदत्तपणे केलेले मूल्यमापन आहे. धीरोदत्त विलाप आणि विचार यांच्या समन्वयाने या लेखनाची कोटी वाढविली आहे".[16] राजकीय, साहित्यिक व सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्तींवरील मृत्युलेखांमध्ये दपर्णात प्रतिबिंब दिसावे तसे व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वांचे आणि कर्तृत्वाचे प्रतिबिंब दिसते. हे मृत्यूलेख म्हणजे अत्र्यांच्या व्यक्तीबद्दलच्या प्रदीर्घ चिंतनाचा, भावानुभूतीच्या रंगाचा, उदात्ततेचा व करूणरम्यतेचा परिपाक होय. अत्र्यांचे व्यासंगी व्यक्तिमत्त्व, गुणग्राहकता, प्रचंड लोकसंग्रह, आंतरिक जिव्हाळ, व्यक्तीपूजकता, करूणरम्यता, उदात्तता, उत्कटता, व्यक्तिविषयक आदरभावाचे सूक्ष्म अवलोकन, जीवनकार्याचे यथोचित मूल्यमापन करण्याची अत्र्यांची वृत्तीदिसून येते. अत्र्यांच्या व्यक्तीमत्त्वाचे अनेक पैलू या लेखनात उमटले आहेत. ते जसे व्यक्तीचे भक्त आहेत तसेच परखड टीकाकारही आहेत. या दोन्ही बाबींचे दर्शन त्यांनी लिहिलेल्या मृत्युलेखांमध्ये देखील दिसून येते. मात्र

मृत्युलेखांमध्ये स्वाभाविकपणे ते गुणग्राहकतेला झुकते माप देताना दिसतात. त्या अनुषंगाने स्वभावातील गुणदोषांचे चित्रण येते. लेखनाच्या ओघात स्वाभाविकपणे काही करुणरम्य सुभाषितांची निर्मिती होते. या लेखनात तीव्र भावनाशीलतेबरोबर व्यक्ती व व्यक्तीच्या जडण घडणीची पार्श्वभूमी, व्यक्तीच्या कार्याचा समाजावरील व स्वतःवरील परिणाम अत्रे नमूद करतात. हे लेखन जरी तत्कालीन प्रसंगाच्या निमित्ताने झाले असले तरी त्याचे स्वरुप मात्र केवळ तत्कालीन राहत नाही तर ते मनात दीर्घकाळ रेंगाळत राहते. सर्वच मृत्युलेखांचे लेखन जरी प्रासंगिक असले तरी वाङ्.मयीन मूल्याच्या दृष्टीने श्रेष्ठ आहे. मृत्युलेख खुलविण्याचे जे अत्र्यांचेच म्हणून कसब आहे त्याचे प्रत्यंतर या लेखनात येते. त्यात उत्स्फूर्तता' आहे, अत्र्यांच्या व्यक्तिगत अनुभूतीचा भावोत्कट उद्‌गार आहे. क्वचित खवचटपणाही आहे. उपहास आहे. अत्र्यांच्या शिक्षकी व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव या लेखनावर असल्याने भाषा संवाद करावा तशी होते. माहितीच्या तपशीलांबरोबर काळाचे संदर्भ येतात. काव्यात्मता, नाटयात्मकता व जीवन विषयक तत्त्वज्ञान यांचा मृत्युलेखांमध्ये सुंदर मिलाफ झाला आहे. या दृष्टीने हे लेखन स्मरणीय झाले आहे.

अत्रे जेंव्हा एखाद्या व्यक्तीवर मृत्युलेख लिहितात तेंव्हा त्यात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे रंग मिसळलेले दिसतात. त्यांच्या स्वभावाचा, शैलीचा व व्यक्तिमत्त्वातील पैलूंचा स्पर्श या मृत्युलेखांस झालेला दिसतो. अत्र्यांच्या मनाला कारुण्याचे असलेले स्वाभाविक आकर्षण मृत्युलेखांमध्ये करुणरम्य सौंदर्यात दिसून येते. त्यामुळे त्यांनी लिहिलेले बहुतांशी मृत्युलेख कारुण्याचा अविष्कार असून त्या त्या व्यक्तींना त्यांनी वाहिलेली आदरांजली होय. त्यांच्या खेळकर स्वभावाचे, मार्मिकतेचेही दर्शन काही मृत्युलेखांमध्ये घडते. त्यांच्या सहजसरळ, सुटसुटीत लयबद्ध, प्रवाही, चित्रमय, ठाशीव, उत्कट, उठावदार लेखनशैलीचेही प्रत्यंतर ह्या लेखनात येते. तसेच त्यांच्या शिक्षकी व्यक्तिमत्त्वातील कथन पद्धती, त्यांच्यातील वक्तृत्वाला असणा–या छटा उपहासगर्भता, त्यांची सूक्ष्म निरीक्षणशक्ती, घणाघाती प्रहार व नर्म विनोद ह्या पैलूंचेही दर्शन होते. त्यांची व्यक्तिपूजकता रसिकता व व्यक्तिनिष्ठा आपल्या प्रत्ययास येते. त्यामुळे अत्र्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे रंग स्वाभाविकपणे मृत्युलेखांमध्ये मिसळलेले दिसतात.

अत्र्यांचे मृत्युलेख खुलवण्याचे कसब महत्त्वपूर्ण आहे. व्यक्तिचा जन्म – मृत्यू यांच्या तारखांची जंत्री देऊन ते कंटाळवाणे वाटेल असे लेखन करीत नाहीत. मृत्यूचा उल्लेख करताना 'काल' 'परवा' 'नुकतेच' असे वैयक्तिक जिव्हाळयाचे शब्द ते वापरतात. लेखनासाठी ते

लोकभाषेचा वापर करून वाचकाशी जिव्हाळयाचे संबंध व्यक्त करतात.भावनिकतेमुळे लेखास साहजिकच ओलावा प्राप्त होतो. तो कोरडा वाटत नाही. अत्र्यांचे व्यक्तीबद्दल सूक्ष्म चिंतन असल्याने ते व्यक्ती तिच्या शरीरप्रकृतीपासून पोषाखापासून स्वभाव, कार्य, स्वतःवरील परिणाम या अनुंषगाने उभी करतात. त्यामुळे लेखन साहजिकच चित्रमय होते.

हे लेखन जरी औपचारिक स्वरूपाचे असले तरी त्यात उत्स्फूर्त जाणीव होते. व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्या व्यक्तीविषयीच्या अत्र्यांच्या चिंतनामधून उत्स्फूर्तपणे हे व्यक्ती दर्शन झाल्याने त्यात काव्यात्मता व नाटयात्मता आली आहे. अत्र्यांच्या व्यक्तिगत अनुभूतीचे हे भावोत्कट उद्‌गार आहेत. कधी कधी त्यांच्या स्वभावानुसार मृत्युलेखातही त्यांची लेखणी खवचटपणे दांभिकावर प्रहार करते व सज्जनांना गोंजारते.

हे लेखन आत्यंतिक आदराच्या भूमिकेतून झाले आहे. क्वचित एखादी तिरस्करणीय व्यक्तीही मृत्युलेखाचा विषय होते.मात्र बहुतांशी लेखनात मृत व्यक्तीबद्दल नितांत आदर व्यक्त झाला आहे. भावनिकतेच्या स्पर्शामुळे लेखनास जिवंतपणा आला आहे. मृत्युलेखात येणा--या माहितीच्या तपशीलांबरोबर स्वाभाविकपणे काळाचे संदर्भही जाणवतात. उदा. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा काळ, स्वातंत्र्योत्तर राजकारणातील विशिष्ट काळातील परिस्थिती यांचे संदर्भ येतात. त्यामुळे साहित्यातील कालिक व्यवस्थेची कल्पना येते.

वरील वैशिष्टयांच्या अनुषंगाने अत्रे लिखित मृत्युलेखांचे लेखन केवळ प्रासंगिक नाही. तर स्मरणीय आहे हे ध्यानात येते. अत्र्यांनी मृत व्यक्तींचे केलेले हे वाड्.मयीन स्मरण वाचकांच्या मनात दीर्घकाळात घोळत राहाते.

वरील विवेचना आधारे खालील निष्कर्ष निघतात.

1) बहुतांशी मृत्युलेखांमधून अत्र्यांची मृत्युलेख नायकांच्या जीवनाशी व कार्याशी असणारी समरसता व्यक्त होते.

2 ) मृत व्यक्तीच्या बाह्याचित्रणा बरोबर व्यक्तिमनाचे व स्वभावाचेही चित्रण मृत्युलेखांमध्ये येते.

3 ) ' समाधीवरील अश्रू' ह्या संग्रहातील मृत्युलेखांचे स्वरूप 'हुंदके' संग्रहातील मृत्युलेखांच्या तुलनेत दीर्घ असल्याने ह्या मृत्युलेखांमधून व्यक्तीच्या जीवनेतिहासाचा विवेचक शोध अत्रे घेताना दिसतात.

4 ) वास्तवाचे भान. असलेल्या अत्र्यांच्या कल्पनाशक्तीचे दर्शन ह्या लेखनात घडते.

5 ) अत्र्यांच्या वाड्.मयीन निष्ठा, व्यासंग, बहुश्रुतता, व्यक्ती निष्ठा, राजकीय मतप्रणाली, सामाजिकता, यांचे दर्शन ह्या लेखनातून घडते.

6 ) अत्र्यांच्या स्वभावाचा, शैलीचा व त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंचा स्पर्श मृत्युलेखांस झालेला दिसतो.

7 ) अत्रे मृत्युलेख लेखनात मृत व्यक्तीबद्दलचा समतोल, जिव्हाळा, भावना, वैयक्तिक हेवे दावे यांचे भान ठेवतात.

8 ) अत्र्यांच्या उपहासगर्भ शैलीतही सळसळत्या कारूण्याचे दर्शन घडते.

9 ) राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक संदर्भांच्या दृष्टीने हे मृत्युलेख महनीय ठरतात.

10 ) अत्र्यांची व्यक्तिपूजकता, रसिकता व व्यक्तीनिष्ठा यांचे मनोज्ञ दर्शन घडवणारे हे लेखन आहे.

*****

## * तळटीपा *

1. प्र. के. अत्रे : 'मी कसा झालो' : पाचवी आवृत्ती : परचुरे, मुंबई : 1987 : पृष्ठ 324
2. प्र. के. अत्रे : 'समाधीवरील अश्रू' : तिसरी आवृत्ती : परचुरे, मुंबई : 1991 : पृष्ठ 46
3. एस. एस. भोसले : 'प्र. के अत्रे साहित्य आणि समीक्षा : प्रथमावृत्ती : अजब, कोल्हापूर : 1976 : पृष्ठ 400.
4. प्र. के. अत्रे : 'मी कसा झालो' पाचवी आवृत्ती : परचुरे, मुंबई : 1987 : पृष्ठ 334.
5. ल. रा. नसिराबादकर : 'आचार्य अत्रे : साहित्यदर्शन : प्रथमावृत्ती : फडके, कोल्हापूर : 1976 : पृष्ठ 194.
6. प्र. के. अत्रे : 'समाधीवरील अश्रू' तिसरी आवृत्ती : परचुरे : मुंबई : 1991 : पृष्ठ 75.
7. ल. रा. नसिराबादकर : 'आचार्य अत्रे साहित्यदर्शन' प्रथमावृत्ती : फडके, कोल्हापूर : 1976 : पृष्ट 249.
8. प्र. के. अत्रे : 'समाधीवरील अश्रू' तिसरी आवृत्ती : परचुरे, मुंबई : 1991 : पृष्ठ 97.
9. तत्रैव : पृष्ठ . 103.
10. तत्रैव : पृष्ठ 117.
11. तत्रैव : पृष्ठ 119.
12. तत्रैव : पृष्ठ 125, 126.
13. तत्रैव : पृष्ठ 137
14. तत्रैव : पृष्ठ 53.
15. ल. रा. नसिराबादकर : आचार्य अत्रे : साहित्य दर्शन : प्रथमावृत्ती : फडके, कोल्हापूर : 1976 : पृष्ठ 197.
16. तत्रैव : पृष्ठ 198, 199.

*****